**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==========================================================

जावक क्रमांक – १६७० दिनांक :- २९ एप्रिल, २०२२

प्रसिद्धीपत्रक

कोंकण मंडळ सदनिका सोडत-२०२१

## यशस्वी अर्जदारांना कागदपत्रे सादर करण्यासाठी ३१ मे पर्यंत अंतिम मुदतवाढ

## प्रधानमंत्री आवास योजना व कोंकण म्हाडा गृहनिर्माण योजनेतील अर्जदारांना संधी

मुंबई, दि. २९ एप्रिल, २०२२ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा (म्हाडा) घटक असलेल्या कोंकण मंडळातर्फे सन २०२१ मध्ये काढलेल्या संगणकीय सोडतीतील प्रधानमंत्री आवास योजना व कोंकण म्हाडा गृहनिर्माण योजनेतील ७८५३ अर्जदारांपैकी पात्रता सिद्ध करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे अद्याप सादर न केलेल्या यशस्वी अर्जदारांना कागदपत्रे सादर करण्यासाठी दि. ३१ मे, २०२२ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.

कोंकण मंडळातर्फे ऑक्टोबर-२०२१ मध्ये ८९८४ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत काढण्यात आली. या सोडतीतील प्रधानमंत्री आवास योजना मधील संकेत क्रमांक २७० अ, २७१ अ, २७९, २८०, २८१ तसेच कोंकण म्हाडा गृहनिर्माण योजनेतील संकेत क्रमांक २५६ ब, २६३ ब, २६८ अ, २६९ अ, २७४ अ, २७८ अ, ३२०, ३२१, ३२२, ३२३ मधील ज्या यशस्वी अर्जदारांनी अद्याप कागदपत्रे सादर केलेले नाहीत अशा यशस्वी अर्जदारांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी दि. ३१ मे, २०२२ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

सदर कागदपत्रे यशस्वी अर्जदारांनी विहित मुदतीत उपमुख्य अधिकारी (पणन), कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, कक्ष क्रमांक २५५, पहिला मजला, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई येथे बँक ऑफ महाराष्ट्राच्या नियुक्त प्रतिनिधीकडे सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत व दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करावीत, असे आवाहन कोंकण मंडळातर्फे करण्यात आले आहे.

सही /-
(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण